-६९/ 125

वन जमिनीवरील अतिक्रमणे हटविण्यासाठी वन अधिका-यांना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील अधिकार प्रदान करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग.
शासन निर्णय क्रमांक- पीडब्ल्यूआर ११९६/२९६/प्र.क्र.१७/ल-२.
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
दिनांक- ३०/१/१९९७.

शासन निर्णय :-

वन जमिनीवर फार मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झाली असून अशा अतिक्रमणांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत चालली आहे. त्यामुळे वनाखालील क्षेत्र कमी होऊन त्याचे दुष्परिणाम पर्यावरण आणि वन्यजीवनावर होत चालले आहेत. शिवाय अशा अतिक्रमणामुळें वन क्षेत्रातील गुन्ह्याचे प्रमाणही मोठ्या प्रमाणात वाढले असून त्यामुळे राष्ट्रीय संपत्तीची मोठ्या प्रमाणात हानी होत असल्याचे निदर्शनाला आले आहे. या बाबींची शासनाने गंभीर दखल घेतली असून अशी अतिक्रमणे प्रभावीपणे हटविण्यासाठी आणि वनाचें संरक्षण व संवर्धन चांगल्या प्रकारे होण्यासाठी राज्यातील वन अधिका-यांना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील कलम ५३, ५४ व ५४-अ चे जिल्हाधिकारी यांचे अधिकार प्रदान करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता.

LND (I)

२. उपरोक्त प्रस्तावावर विचारविनिमय करून महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ५३, ५४ व ५४-अ चे जिल्हाधिकारी यांचे अधिकार महाराष्ट्र शासनाच्या वन विभागाचे सहाय्यक वनसंरक्षक, उपविभागीय वन अधिकारी आणि उपवनसंरक्षक या अधिका-यांना प्रदान करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. त्यानुसार हे अधिकारी त्यांच्या अधिकारतेतील महाराष्ट्र शासनाच्या वन विभागाच्या ताब्यातील राखीव वने, संरक्षित वने व अन्य वन जमिनीच्या संबंधात उपरोक्त कलमातील अधिकाराचा आता वापर करु शकतील.

WS-243

३. उपरोक्त निर्णयाच्या अनुषंगाने सोबत जोडलेली अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र भाग चार-ब [असाधारण] मध्ये प्रसिध्द करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई- ४००००४ यांनी सोबतची अधिसूचना [ मराठी व इंग्रजी ] महाराष्ट्र

969

जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी.
15 FEB 1997

शासन राजपत्र भाग चार–ब [असाधारण] मध्ये प्रसिध्द करावी व तिच्या प्रती सोबत जोडलेल्या वितरण सूचीप्रमाणे सर्व संबंधीतांना परस्पर वितरीत कराव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

[ अजित वर्टी ]
प्रधान सचिव, महसूल व वन विभाग.

प्रति,

१] सर्व विभागीय आयुक्त.

२] सर्व जिल्हाधिकारी.

३] सर्व अप्पर जिल्हाधिकारी.

४] प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, ...